मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ । पान १

# बोगस परवानग्यांमुळे शहरात धोकादायक बांधकामे

## शहरातील बांधकाम प्रकल्पांना नियमानुसार परवानगी देणे आवश्यक

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** वाकड येथे तीन मजली इमारत कलल्यामुळे धोकादायक झाली होती. त्यामुळे हे बांधकाम जमीनदोस्त करावे लागले. शहरातील बांधकाम प्रकल्पांना नियमानुसार परवानगी देणे आवश्यक आहे. तांत्रिक बाबी व सुरक्षेच्या दृष्टीकोनातून बांधकाम अभियांत्रिकीचे निकष पायदळी तुडवत परवानगी दिल्यानेच अशी धोकादायक बांधकामे शहरात होत आहेत. महापालिका प्रशासनाकडून खाबुगिरीचे ‘इमले’ उभारल्यानेच हे प्रकार घडत आहेत, असा आरोप भाजपाचे माजी पदाधिकारी अमोल थोरात यांनी केला



आहे. वाकड येथे तीन मजली इमारत धोकादायकपद्धतीने उभारण्यात आली. महापालिकेला ही इमारत पाडावी लागली. ही मोठी नामुष्की असून, बांधकाम अभियांत्रिकी क्षेत्रासाठी लाजीरवाणी बाब आहे. याला पूर्णपणे महापालिका प्रशासन जबाबदार आहे, असा आरोप अमोल थोरात यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केला आहे. शहरातील बांधकामांना परवानगी देण्यासाठी महापालिकेकडे स्वतंत्र बांधकाम परवाना विभाग आहे. महापालिका हद्दीतील प्रत्येक बांधकाम प्रकल्पाला परवाना विभागाकडून परवानगी घेणे आवश्यक असते. वाकड येथील ‘त्या’ बांधकामाला देखील परवानगी देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. अशी परवानगी देताना महापालिका परवानगी विभागातील संबंधित अधिकारी, वास्तू विशारद, आरेखक, बांधकाम अभियांत्रिकीशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी या प्रकल्पाबाबत परवानगी देताना नियमांकडे दुर्लक्ष केले. तसेच बांधकामांसाठी आवश्यक निकषांना बाजूला सारत परवानगी दिली. परिणामी बांधकाम धोकादाय होऊन इमारत पाडावी लागली. महापालिका आयुक्त म्हणून शेखर सिंह यांचा संबंधित विभागावर वचक नसल्याचे दिसून येते. तसेच महापालिका प्रशासनाकडून खाबुगिरीचे हे ‘इमले’ त्यांच्याच संमतीने उभारण्यात येत असल्याचे दिसून येते. यापूर्वीही महापालिकेच्या विविध विभागांमधील गैरप्रकार चव्हाट्यावर आले. मात्र, तरीही महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घातले. तसेच स्वतः देखील काही चुकीचे निर्णय घेऊन शहरवासीयांच्या पैशांची उधळपट्टी केली. प्रयोग म्हणून काही प्रकल्पांसाठी मोठा खर्च केला. मात्र, प्रत्यक्षात हे प्रकल्प पूर्णपणे फसले महापालिका प्रशासनातील खाबुगिरी वाकड येथील पाडण्यात आलेल्या इमारतीच्या प्रकरणावरून समोर आली आहे. याप्रकरणी महापालिका आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच इतर विभागांतील खाबुगिरी मोडीत काढावी, अशी मागणी अमोल थोरात यांनी प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

# शहरात व्हॅलेंटाईन्स डे निमित्त ‘प्रेमाचा’ बहर..!

## ग्रीटिंग कार्ड्स यांची खरेदी, लाल गुलाबांनी फुललेल्या बाजारपेठा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** आपल्या प्रिय व्यक्तीला देण्यासाठी खरेदी करण्यात येणारी गिफ्ट्स, ग्रीटिंग कार्ड्स यांची खरेदी, लाल गुलाबांनी फुललेल्या बाजारपेठा, व्हॉटस अॅप, फेसबुक आणि इंस्टाग्रॅमवर एकमेकांना देण्यात येणाऱ्या शुभेच्छा, स्टेटस्, हॉटेलिंग, सिनेमा किंवा बाहेर फिरायला जाण्याचे करण्यात आलेले नियोजन, शहरातील हॉटेल्स व कॅफेमध्ये करण्यात आलेली सजावट. असे गुलाबी वातावरण शहरात बुधवारी (ता.१४) पाहायला मिळाले. प्रेमाचा दिवस म्हणून ओळखला



जाणारा व्हॅलेंटाइन डे’ चा उत्साहात साजरा करण्यात आला. फेब्रुवारी महिना सुरू झाला की, तरुणाईला व्हॅलेंटाईन्स डे चे वेध लागतात. आपल्या प्रिय व्यक्तीला मनातील भावना सांगण्याचा हा दिवस. ‘रोज डे’ पासूनच व्हॅलेंटाइन वीक साजरा केला जातो. त्यामुळे या दिवसात गुलाबांच्या फुलांना खास मागणी असते. ‘व्हॅलेंटाईन्स डे’ ला आपल्या प्रिय व्यक्तीला गुलाब भेट देण्यात येत असल्याने गुलाबांच्या फुलांची किंमतही वाढली आहे. दहा ते पंधरा रुपये किमतीच्या गुलाबांच्या फुलाची किंमत बुधवारी (ता.१४) वीस ते पंचवीस रुपये एवढी होती. खास व्हॅलेंटाइन डे'मुळे गुलाबांच्या बुकेंच्या किमतीही वाढल्याचे चित्र होते. फुलांच्या संख्येनुसार या बुकेंची किंमत पाचशे ते बाराशे रुपये एवढी होती. विविध रंगांच्या गुलाबाचे बुके तसेच हार्ट शेपचे बुके बनवून घेण्याकडे तरुणाईचा कल असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. सकल मराठा समाजाच्यावतीने बुधवारी (ता.१४) महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आल्याने तरुणाई व व्यावसायिकांमध्ये सकाळी संभ्रमाचे वातावरण होते. बंदला मिळालेल्या संमिश्र प्रतिसादामुळे दुपारनंतर कॅफे , गिफ्टची दुकाने, केक शॉप याठिकाणी तरुणाईची गर्दी वाढू लागली. ही ठिकाणे लाल फुग्यांनी सजविण्यात आली. ‘व्हॅलेंटाईन्स डे’ निमित्त अनेक हॉटेल्समध्ये खास इव्हेंटसचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी टेबल बुक करण्याचीही लगबग दिसून येत होती. केवळ प्रेमी युगुलच नाही तर अनेकांनी आपले मित्र मैत्रिणी व कुटुंबीयांसोबत वेळ घालवतही हा दिवस साजरा केला.

# मोशीत भरणार महाराष्ट्रातील सर्वात मोठे शिवकालीन शस्त्र प्रदर्शन

## शिवरस्ता सांस्कृतिक मंडळाचा शिवजयंतीनिमित्त उपक्रम

**मोशी**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** आरोग्य बिघडून टाकणाऱ्या मोबाईल इंटरनेटच्या जमान्यात शरीर कमावून देणारे मर्दानी खेळ जसे दुर्लक्षित होते गेले. तसेच युध्दकला आणि शस्त्रांशी असलेले नातेही पुसट होत गेले. हेच नाते घट्ट करण्यासाठी शिवरस्ता सांस्कृतिक मंडळाच्या वतीने मोशी-चिखली शिवरस्ता येथे दि.१६ आणि १७ फेब्रुवारी रोजी मर्दानी खेळाचे प्रशिक्षक आणि शस्त्रांचे संग्राहक आनंद ठाकूर यांचे शिवकालीन शस्त्र प्रदर्शन आयोजित केले आहे.मागील पाच वर्षापासून या मंडळाच्या




वतीने शिवजयंती उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. यंदाही शिवरस्ता येथे १६ ते १९ फेब्रुवारी दरम्यान विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता या शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. यामध्ये शस्त्रांची माहिती तसे गड प्रदर्शन माहिती दिली जाणार आहे. दोन दिवसीय शिबिरास परिसरातील नागरिकांनी जास्तीत-जास्त भेट द्यावी असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.१६ प्रकारचे दांडपट्टे समशेर, राजाराणी तलवार,मराठा धोप, उंटावरची तोफ, गेंड्याच्या कातडीची ढाल, कासवाची ढाल, अडकित्याचे असंख्य प्रकार, राजाराणी खंजीर, त्रिमुखी खंजीर चंद्रभान, कट्यारी, हस्तीदंताचे खंजीर, चिलखते, कुऱ्हाडी बंदू, माडू अशा असंख्य प्रकारांनी त्यांचे शस्त्रागार समृध्द झाले आहे. हा सगळा संग्रह आथा साडेचार हजार वस्तूंचा झाला असून, देशभरातील शस्त्रप्रकारांचे दर्शन आनंद ठाकूर यांच्याकडे होते. प्रामुख्याने पंजाब, राजस्थान, हरयाणा, इंदूर आणि महाराष्ट्रातील शस्त्रांची त्यांच्या संग्रहात समावेश आहे.शिवजयंती निमित्त १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ ते ९ दरम्यान सोसायटीतील सांस्कृतिक कायर्क्रम व खाऊ गल्ली, १८ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा ते पाच मोफत आरोग्य तपासणा व रक्तदान शिबिर होणार आहे. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते १० शिवज्योत आगमन तर दुपारी ४ ते ६ महिलांची बाईक रॅली असणार आहे. सायंकाळी ६ ते ८ भव्य मिरवणूक होईल. सायंकाळी आठ वाजता भव्य महाशिवआरती व महाप्रसाद असे नियोजन आहे. शहर आणि मोशी परिसरातील जास्तीत-जास्त नागरिकांनी शिवकालीन शस्त्रप्रदर्शनाला भेट द्यावी असे आवाहन शिवरस्ता सांस्कृतिक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.

---

# रहाटणीत ड्रेनेज पाईपलाईन टाकण्याच्या कामास सुरुवात

## माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या पाठपुराव्याला यश

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या सतत पाठपुराव्याने रहाटणी परिसरातील गणराज कॉलनी याठिकाणी दीर्घकाळ प्रलंबित असलेले ड्रेनेज पाईपलाईन टाकण्याचे काम आज (दि.१४) सुरू करण्यात आले आहे. गेली अनेक वर्षे गणराज कॉलनी याठिकाणी ड्रेनेज विषयीचा प्रश्न नागरिकांना भेडसावत होता. सतत ड्रेनेज लाईन तुंबत असल्याने परिसरातील



नागरिक त्रस्त झाले होते आणि यामुळे होणाऱ्या घाणीच्या साम्राज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. सदर बाब माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या निर्दर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने संबंधित महापालिका ड्रेनेज विभागाला याबाबत माहिती दिली. आणि वाढती नागरीवस्ती पाहता उपलब्ध ड्रेनेज पाईपलाईन वर अतिरिक्त ताण पडत असल्यामुळे आणि भविष्यातील वाढ लक्षात घेता अस्तित्वात असलेली जुनी ड्रेनेज लाईन बदली करून त्याठिकाणी नवीन ३०० mm व्यासाची पाईपलाईन टाकण्याच्या सूचना संबंधित विभाग प्रमुख यांना दिले होते. शत्रुघ्न काटे यांनी दिलेल्या सूचनांची दखल घेत महापालिकेमार्फत गणराज कॉलनी याठिकाणी नवीन ३०० mm व्यासाची नवीन ड्रेनेज पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. शत्रुघ्न काटे यांनी प्राथमिकतेने आमचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल गणराज कॉलनी मधील राहिवासीयांनी समाधान व्यक्त केले आहे.

# पक्ष विलीनीकरणाच्या वृत्ताचे खंडन!

## पवार यांच्या मोदीबाग येथील कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
राज्यात राजकीय स्थित्यंतरे होत असतानाच 'राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार' पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याची चर्चा बुधवारी या पक्षाच्या बैठकीनंतर रंगली. मात्र पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी विलीनीकरणाचा मुद्द्याचे तातडीने खंडन केले. पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह यासाठी सर्वोच्च न्यायालयात लढा सुरू असला तरी, प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेची शक्यता असल्याने नवीन नाव आणि चिन्हासह आगामी लोकसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासंदर्भात ही बैठक होती. तशी सूचना पवार यांनी केल्याचा दावा करण्यात आला. दरम्यान, काँग्रेसला न दुखविण्याची सूचनाही पवार यांनी या बैठकीत केल्याचे सांगण्यात आले.आगामी लोकसभा आणि त्यानंतर होणाऱ्या



विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने शरद पवार यांच्या मोदीबाग येथील कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. पक्ष आणि चिन्ह गेल्यानंतरची पक्षाची ही पहिलीच मोठी बैठक होती. खासदार सुप्रिया सुळे, वंदना चव्हाण, श्रीनिवास पाटील, डॉ. अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार, संदीप क्षीरसागर, माजी मंत्री अनिल देशमुख, राजेश टोपे, शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर पुणे जिल्ह्यातील एका माजी पदाधिकाऱ्याने काँग्रेसमध्ये विलीनीकरणासंदर्भातील चर्चा या बैठकीत झाल्याचा दावा एका वृत्तवाहिनीशी बोलताना केला. त्यानंतर विलीनीकरणाचा मुद्दा रंगण्यास सुरुवात झाली. त्याची चर्चा सुरू असतानाच पक्षाच्या नेत्यांनी मात्र त्याचे तातडीने खंडन केले. सुप्रिया सुळे, रोहित पवार, डॉ. अमोल कोल्हे यांनी विलीनीकरणाच्या संदर्भात कोणतीही चर्चा झाली नसल्याचे सांगितले.

केंद्रात आणि राज्यात सुरू असलेली दडपशाही जनता पहात आहे. त्यामुळे जनतेपर्यंत पोहोचून त्यांना धीर द्यायचा आहे. नवे पक्ष आणि निवडणूक चिन्ह घेऊन निवडणुकीला सामोरे जायचे आहे, असा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आल्याचा दावा नेत्यांकडून करण्यात आला.दरम्यान, आगामी निवडणुकीत काँग्रेसला न दुखविण्याची सूचना केल्याची माहितीही काही पदाधिकाऱ्यांनी दिली. महाविकास आघाडीतील मित्र पक्षांशी सुसंवाद साधा, असे सांगणे म्हणजे विलीनीकरण होत नाही, असा दावाही करण्यात आला.पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह यासाठी सर्वोच्च न्यायालयात लढा सुरू असला तरी, प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेची शक्यता असल्याने नवीन नाव आणि चिन्हासह आगामी लोकसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासंदर्भात ही बैठक होती. तशी सूचना पवार यांनी केल्याचा दावा करण्यात आला. दरम्यान, काँग्रेसला न दुखविण्याची सूचनाही पवार यांनी या बैठकीत केल्याचे सांगण्यात आले.आगामी लोकसभा आणि त्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने शरद पवार यांच्या मोदीबाग येथील कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. पक्ष आणि चिन्ह गेल्यानंतरची पक्षाची ही पहिलीच मोठी बैठक होती. खासदार सुप्रिया सुळे, वंदना चव्हाण, श्रीनिवास पाटील, डॉ. अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार, संदीप क्षीरसागर, माजी मंत्री अनिल देशमुख, राजेश टोपे, शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर पुणे जिल्ह्यातील एका माजी पदाधिकाऱ्याने काँग्रेसमध्ये विलीनीकरणासंदर्भातील चर्चा या बैठकीत झाल्याचा दावा एका वृत्तवाहिनीशी बोलताना केला. त्यानंतर विलीनीकरणाचा मुद्दा रंगण्यास सुरुवात झाली. त्याची चर्चा सुरू असतानाच पक्षाच्या नेत्यांनी मात्र त्याचे तातडीने खंडन केले. सुप्रिया सुळे, रोहित पवार, डॉ. अमोल कोल्हे यांनी विलीनीकरणाच्या संदर्भात कोणतीही चर्चा झाली नसल्याचे सांगितले. केंद्रात आणि राज्यात सुरू असलेली दडपशाही जनता पहात आहे.

# चंद्रकांतदादांचा मुक्काम कोल्हापूर सोडून पुण्यातच!

## भाजपने एका दगडामध्ये अनेक पक्षी मारल्याचे बोलले जात आहे

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पकडून राज्यसभा उमेदवार घोषित करण्यात आले, तरी महाराष्ट्राची मात्र यादी काही येत नव्हती. ती यादी अखेर आली असून भाजपकडून तीन नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. यामध्ये काँग्रेसला सोडचिट्ठी देत पक्षांमध्ये आलेल्या अशोक चव्हाण यांना अपेक्षितपणे राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. त्याचबरोबर कोथरूडच्या माजी आमदार मेधा कुलकर्णी ) यांना सुद्धा उमेदवारी देण्यात आली आहे. तिसरे उमेदवार डॉक्टर अजित गोपछडे यांना देण्यात आली आहे. दुसरीकडे, भाजपमध्ये अनेक नावे चर्चेत असताना मेधा कुलकर्णी यांनी राज्यसभेचे उमेदवारीमध्ये बाजी मारल्याने राजकीय भुवया सुद्धा उंचावले गेल्या आहेत. मात्र, मेधा कुलकर्णी यांची उमेदवारी निश्चित करताना भाजपने एका दगडामध्ये अनेक पक्षी मारल्याचे बोलले जात




आहे. पुणे हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र, त्याठिकाणी गेल्या काही दिवसांपासून नाराजी दिसून आली होती. कोथरूडमध्ये २०१४ च्या निवडणुकीत मेधा कुलकर्णी या तब्बल ६४ हजार मतांनी निवडून येऊन सुद्धा २०१९ मध्ये त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली. या ठिकाणी भाजपचे नेते चंद्रकांत पाटील (उहरपवअॅरज़रपीं झरींळश्र) यांना रिंगणात उतरविण्यात आले. या ठिकाणी चंद्रकांत पाटील यांनी विजय खेचून आणला. मात्र, त्यांना बराच संघर्ष करावा. यानंतर कोथरूडची हक्काची जागा गेल्याने मेधा कुलकर्णी या सातत्याने नाराज होत्या. त्यांनी आपली नाराजी स्पष्टपणे राज्यस्तरातील नेतृत्वापासून ते पार केंद्रीय नेतृत्वापर्यंत बोलून दाखवली होती. विधानपरिषद आणि राज्यसभा निवडणुकीमध्येही त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. दुसरीकडे, कसबा पोटनिवडणुकीत मुक्ता टिळक यांच्या कुटुंबातील उमेदवारी न देता हेमंत रासने यांना उमेदवारी देण्यात आली होती. त्यामुळे एक प्रकारे ब्राह्मण समाजाकडे दुर्लक्ष तरी होत नाही ना? अशी सुद्धा चर्चा भाजपमध्ये आणि पुण्यामध्ये सुरू होती. मात्र आता राज्यसभेच्या माध्यमातून मेधा कुलकर्णी यांची नाराजी दूर केल्याने भाजपने एक प्रकारे त्यांचं राजकीय पुनर्वसन केल्याचे बोलले जात आहे.

# दाभोलकर हत्याप्रकरणाची सुनावणी अंतिम टप्प्यात

## आरोपींवर दाखल केलेला गुन्हा होतो सिद्ध

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्याप्रकरणात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) अंतिम युक्तिवादास सुरुवात करण्यात आली आहे.डॉ. दाभोलकर हत्याप्रकरणाची सुनावणी विशेष न्यायाधीश पी. पी. जाधव यांच्या न्यायालयात सुरू आहे. सीबीआयचे विशेष सरकारी वकील ॲड. प्रकाश सूर्यवंशी यांनी मंगळवारी अंतिम युक्तिवादास सुरुवात केली. डॉ. दाभोलकर अनिष्ठ प्रथा आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करत होते. आरोपींनी त्यांच्यावर पिस्तुलातून गोळ्या झाडून खून करून अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये दहशत निर्माण केली. आरोपींविरुद्ध बेकायदा शस्त्र बाळगणे, तसेच बेकायदा हालचाली प्रतिबंध कायद्यान्वये (यूएपीए) कारवाई करण्यात आली होती. आरोपींवर दाखल केलेला गुन्हा सिद्ध होतो.



या खटल्यातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी आरोपींना न्यायालयात ओळखले आहे, अशी माहिती सीबीआयच्या वतीने न्यायालयात देण्यात आली.डॉ. दाभोलकर यांचे पुत्र डॉ. हमीद दाभोलकर, अंनिसचे कार्यकर्ते प्रशांत पोतदार आणि कोल्हापूर येथील व्यावसायिक संजय साडविलकर यांच्या साक्षीतून सनातन संस्था आणि आरोपी तावडे यांच्या मनात दाभोलकरांविषयी शत्रुत्वाची आणि द्वेषाची भावना होती, हे सिद्ध झाले आहे.

त्यांच्यावर गोळ्या झाडणारे आरोपी सचिन अंधुरे आणि शरद कळसकर यांना दोन प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी छायाचित्रासह न्यायालयात ओळखले आहे. आरोपी अंधुरे याने गुन्हा केल्याचा अतिरिक्त न्यायालयीन कबुलीजबाब दिला आहे. दाभोलकरांवर गोळ्या झाडण्यासाठी आरोपींनी वापरलेले पिस्तूल जप्त झाले नाही. मात्र, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी पिस्तुलातून गोळीबार झाल्याचे सांगितले आहे. दाभोलकरांच्या मृतदेहातून दोन गोळ्या बाहेर काढण्यात आल्याचे ससून रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजय तावरे यांनी न्यायालयात सांगितले आहे. त्यामुळे गोळीबार झाल्याचे सिद्ध होते, असे ॲड. सूर्यवंशी यांनी युक्तिवादात सांगितले. खटल्याची पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी रोजी होणार आहे. सरकारी वकील ॲड. सूर्यवंशी बचाव पक्षाच्या युक्तिवादावर म्हणणे मांडणार आहेत. सरकार पक्षाचा युक्तिवाद पूर्ण झाल्यावर बचाव पक्षाकडून अंतिम युक्तिवादास सुरुवात करण्यात येणार आहे.

### दाखल केलेला गुन्हा सिद्ध

» आरोपींनी त्यांच्यावर पिस्तुलातून गोळ्या झाडून खून करून अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये दहशत निर्माण केली. आरोपींविरुद्ध बेकायदा शस्त्र बाळगणे, तसेच बेकायदा हालचाली प्रतिबंध कायद्यान्वये (यूएपीए) कारवाई करण्यात आली होती. साक्षीदारांनी आरोपींना न्यायालयात ओळखले आहे, अशी माहिती सीबीआयच्या वतीने न्यायालयात देण्यात आली.डॉ. दाभोलकर यांचे पुत्र डॉ. हमीद दाभोलकर, अंनिसचे कार्यकर्ते प्रशांत पोतदार आणि कोल्हापूर येथील व्यावसायिक संजय साडविलकर यांच्या साक्षीतून सनातन संस्था आणि आरोपी तावडे यांच्या मनात दाभोलकरांविषयी शत्रुत्वाची आणि द्वेषाची भावना होती.

# आधी बिहारची निवडणूक, मगच खासदारकीचा विचार

## भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांची स्पष्टोक्ती

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

बिहारची निवडणूक २०२५ मध्ये होणार आहे. बिहारमध्ये भाजपचा मुख्यमंत्री आणण्याचे ध्येय आहे. त्यामुळे बिहारची निवडणूक होईपर्यंत खासदारकीसाठी इच्छुक नाही, अशी स्पष्टोक्ती भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी केली. राज्यसभेसाठी भाजपकडून अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी आणि अजित गोपछडे यांना उमेदवारी जाहीर केली. बिहारमध्ये झालेल्या सत्तापालटानंतर विनोद तावडे यांचेही नाव राज्यसभेसाठी चर्चेत होते. तसेच आगामी लोकसभा निवडणुकीसाठीही तावडे यांना भाजपकडून तिकीट मिळणार का, या बाबत चर्चा आहे. राज्यसभेसाठी जाहीर झालेल्या उमेदवारीच्या पार्श्वभूमीवर जागतिक पुस्तक महोत्सवाला तावडे यांनी भेट दिली.खासदारीबाबत विचारले असता तावडे म्हणाले, की बिहारची निवडणूक हे सध्या प्राधान्य आहे. या निवडणुकीतून भाजपचा मुख्यमंत्री करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे बिहारची निवडणूक होईपर्यंत लोकसभा आणि राज्यसभा दोन्हीकडे खासदारकीसाठी इच्छुक नाही. २०२५ नंतरच खासदारकीबाबत विचार करता येईल. राज्यसभेसाठी भाजपकडून दिलेल्या उमेदवारीबाबतही तावडे यांनी प्रतिक्रिया दिली. उमेदवारीमध्ये चांगल्या प्रकारे समतोल राखण्यात आल्याचे तावडे यांनी सांगितले. बिहारची निवडणूक २०२५ मध्ये होणार आहे. बिहारमध्ये भाजपचा मुख्यमंत्री आणण्याचे ध्येय आहे. त्यामुळे बिहारची निवडणूक होईपर्यंत खासदारकीसाठी इच्छुक नाही, अशी स्पष्टोक्ती भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी केली. राज्यसभेसाठी भाजपकडून अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी आणि अजित गोपछडे यांना उमेदवारी जाहीर केली. बिहारमध्ये झालेल्या सत्तापालटानंतर विनोद तावडे यांचेही नाव राज्यसभेसाठी चर्चेत होते.

